# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**नेवजाबाई हितकारीणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी जि. चंद्रपुर**

**ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग**

## शोध प्रकल्प अहवाल

**-: विषय :-**

**"ब्रम्हपूरी तालुक्यातील सार्वजनिक ग्रंथालयामध्ये गहाळ झालेल्या ग्रंथाच्या वसुलीबाबतच्या समस्याया अभ्यास"**


**संशोधनकर्ता**

[illegible] आर. कपूर

**मार्गदर्शक / विभाग प्रमुख**

कु. प्रा. आर. आर ठाकरे

ने. हि. महाविद्यालय, ब्रम्हपुरी

**प्राचार्य**

डॉ. डी. एच. गाहणे

(M.sc, Ph.D, DCOS)

ने. हि. महाविद्यालय, ब्रम्हपुरी


सत्र २०२३-२४

apkateacher.com

# प्रतिज्ञापत्र

मी. **रणवीर आर. कपूर** प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की गोंडवाना विद्यापिठ, गडचिरोली. सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षात होणाऱ्या ग्रंथालय व माहीतीशास्त्र पदव्युत्तर शाखेतील पदविसाठी " ब्रम्हपूरी तालुक्यातील सार्वजनिक ग्रंथालयामध्ये गहाळ झालेल्या ग्रंथाच्या वसुलीबाबतच्या समस्याया अभ्यास" यांच्या विषयावर **कु. प्रा. आर. आर. ठाकरे** यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प सादर करीत आहे

प्रस्तुत शोध प्रकल्प मी संशोधन केलेले असून या आधी या विषयावर शोध प्रकल्प करण्यात आलेला नाही.

दिनांक :- १/१/२०२४

स्थळ :- ब्रम्हपूरी

संशोधनकर्ता

आस्तिक माधव मडावी

(ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग)

ने.हि. महाविद्यालय ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर

apkateacher.com

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की **रणवीर आर. कपूर** हा नेवजाबई हितकारिणी महाविद्यालयाचे ग्रंथालय आणि माहिती शास्त्र भाग-२ या वर्गाचे विद्यार्थी असून "सार्वजनिक ग्रंथालयातील गहाळ झालेल्या ग्रंथाच्या वासुलीबाबत समस्यांचा अभ्यास" या विषयावर शोध प्रकल्प माझ्या मार्गदर्शनाखाली शोध प्रकल्प पूर्ण केलेल्या आहे.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली विद्यापीठातील ग्रंथालय आणि माहिती शास्त्र पदव्युत्तर शिक्षण क्रमासाठी शोध प्रकल्प सादर करीत आहे.

दिनांक :- १/१/२०२४

स्थळ :- ब्रम्हपूरी

मार्गदर्शक

कु. प्रा. आर. आर ठाकरे

(ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग)

ने.हि. महाविद्यालय ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर

apkateacher.com

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते कि **रणवीर आर. कपूर** हा नेवजाबाई हितकारणी महाविद्यालयाचे ग्रंथालय व माहितीशास्त्र भाग-२ वर्गाचे विद्यार्थी आहे त्यांना खालील कारणासाठी प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

- ★ सदर विद्यार्थ्याने "ब्रम्हपूरी तालुक्यातील सार्वजनिक ग्रंथालयामध्ये गाहाळ झालेल्या ग्रंथाच्या वासुलीबाबत समस्यांचा अभ्यास" या विषयावर शोध प्रकल्प तयार केला आहे.
- ★ सादर विद्यार्थ्याने २०२३-२४ एका शैक्षणिक वर्षात समाधानकारक संशोधन करून प्रकल्प लिहिला आहे.
- ★ विद्यार्थ्यांनी परिक्षेचा एक भाग म्हणून हा शोध प्रकल्प
- ★ सादर करण्यासारखा आहे.
- ★ हा प्रकल्प प्रा. आर.आर. ठाकरे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला आहे.

दिनांक :- १/१/२०२४

स्थळ :- ब्रम्हपूरी

प्राचार्य

डॉ. डी. एच. गाहणे

(M.sc, Ph.D, DOCS)

ने.हि. महाविद्यालय ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर

apkateacher.com

# ऋणनिर्देश

प्रस्तुत शोध प्रबंध पूर्ण करण्यास माझ्या मार्गदर्शिका **कु. आर. आर. ठाकरे** यांनी जे अनमोल मार्गदर्शन केले. त्या करिता मी त्यांचे आभार मानते

नेवजाबई हितकरिणी महाविद्यालय ब्रम्हपूरीचे प्राचार्य **डॉ. डी. एच. गाहणे** यांचे ही आभार मानते. त्याचं प्रमाणे या महाविद्यालयाचे ग्रंथालयीन कर्मचारी वर्गाची आणि ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाचे सर्व प्राध्यापकरुंद यांचेही वेळोवेळी सहकार्य लाभले त्याबद्दल त्यांचेही आभार.

उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहीत केले ते माझे माता पिता श्री. माधव मडावी आणि आई सौ. निर्मला माधव मडावी यांचे मी कधीही ऋण न फेडू शकणारे याचे मी सदैव आभारी आहे.

हा अभ्यासक्रम व प्रकल्प पूर्ण करताना यांचे प्रोत्साहन व सहकार्य लाभले ते माझे मित्र मैत्रिणी यांचे मी सदैव आभार मानते.

तसेच ज्यांनी मला प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या मदत केली त्या सर्वाचा मी आभारी आहे.

धन्यवाद!

संशोधनकर्ता
रणवीर आर. कपूर
(ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग)
ने.हि. महाविद्यालय ब्रम्हपूरी

apkateacher.com

# अनुक्रमणिका


| प्रकरण | विवरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रतिज्ञापत्र | |
| | प्रमाणपत्र | |
| | प्रमाणपत्र | |
| प्रकरण १ | प्रस्तावना | १-१२ |
| प्रकरण २ | सार्वजनिक ग्रंथालय | १३-२२ |
| प्रकरण ३ | संशोधन पद्धती | २३-३४ |
| प्रकरण ४ | सार्वजनिक ग्रंथालयाची ओळख | ३५-४२ |
| प्रकरण ५ | निष्कर्ष | ४३-४६ |
| परिशिष्टे | ग्रंथसूची<br>प्रश्नावली | ४७-४९<br>५०-५६ |


apkateacher.com

# प्रकरण १ ला

# प्रस्तावना

apkateacher.com

# प्रकरण १ ला

## “ब्रम्हपुरी तालुक्यातील सार्वजनिक ग्रंथालयामध्ये गहाळ झालेल्या ग्रंथाच्या वसुलीबाबतच्या समस्यांचा अभ्यास”

**प्रस्तावना :-**

ब्रम्हपुरी तालुक्यातील सार्वजनिक गंथालयामध्ये गहाळ झालेल्या ग्रंथाच्या वसुलीबाबत समस्यांचा अभ्यास मी हाती घेतलेला आहे. कारण हया समस्यांचा अभ्यास कुठेही झालेला नाही. त्यामुळे हा विषय मी हाती घेतलेला आहे.

ग्रंथ हरविणे ही एक दुखद: समस्या आहे तसेच एक तो स्पष्ट प्रश्न आहे. व हया स्पष्ट प्रश्नाला ग्रंथपालाला तोंड द्यावे लागत आहे. कारण गहाळ झालेल्या ग्रंथाची वसुली कोणत्या पध्दतीने करावी हे ही कार्य तितकेच कठीण आहे. त्यामुळे हया समस्येला प्रत्येक ग्रंथपालाला अनिषेध काटेकोरपणे तोंड द्यावे लागत आहे. हा प्रश्न जगातील प्रत्येक ग्रंथालयामध्ये आढळणारा आंतरराष्ट्रीय साथीचा रोग आहे. हा प्रश्न सर्व मर्यादा व अपवादा पलीकडचा आहे. व हया प्रश्नातून कोणतेही ग्रंथालय सुट्ट शकत नाही. ग्रंथ गहाळ हे अनेक प्रकारे होतात. कुणी पुस्तक

apkateacher.com

निर्गमित करून नेतात व काही  दिवसानंतर सांगतात की ते हरविले असे जेव्हा ते सांगतात तेव्हा ग्रंथपालाला प्रश्न पडतो की हया पुस्तकाची किंमत कशा प्रकारे वसूल करावी कारण जर त्याच्याकडून त्या पुस्तकाची समजा दुप्पट किंमत जरी वसूल केली तरी त्याला समाधान राहणार नाही. कारण जे पुस्तकाचे महत्व असते ते पैशानी येत नाही. त्यामुळे वसूल करतांना सुध्दा अनेक समस्यांना सामोर जावे लागते. कुणी असे सांगतात की मी हे पुस्तक नेल्यानंतर गावाला गेलो व जातांना ते पुस्तक ज्या बॅगमध्ये होते ती बॅग चोराला गेली. तसेच ज्या जागेवरून पुस्तक घेतात व अन्य कुठेतरी ठेवून देतात अशा अनेक प्रकारांनी ग्रंथ गहाळ होतात. त्याचप्रमाणे ग्रंथचोर हे संधी साधण्यासाठी अती उत्साही असतात. ते छोटया मोठया ग्रंथालयामधूनच नाही तर दुकानातून सुध्दा चोरतात. ग्रंथ
चोरीचा हा जागतिक चमत्कार स्पष्ट करण्यासाठी कोणतेही एक कारण पूरेसे नाही व त्यामुळे त्याच्या वसूलीच्या समस्या सुध्दा अनेक आहे तेव्हा कोणत्या प्रकारे ग्रंथाची किंमत वसूल करावी हया प्रश्नाला प्रत्येक ग्रंथालयाप्रमाणे महाविद्यालयातील ग्रंथालयांना सुध्दा
तोंड दयावे लागत आहे. म्हणून ह्या समस्येचा उहापोह करण्यासाठी मी हा विषय निवडला आहे.

एके काळी ग्रंथालय हे एक ग्रंथ साठविण्याचे कोठार समजण्यात येत असून तिथे ग्रंथ साठवून ठेवल्या जात होती. पूर्वी ग्रंथालय वयक्तीक संतत्ती समजल्या जायची. राजे महाराजे तसेच श्रीमंत व्यक्ती स्वतःच्या घरी वैयक्तीक उपयोगासाठी पुस्तके ठेवायचे.
त्यावेळेला ग्रंथ व वाचक सुध्दा कती असायचे. छपाई शक्य झाली. संपूर्ण जगात छापील

apkateacher.com

वाङ:मयाच्या सहाय्याने ज्ञान अती लवकर पसरविले गेले त्यामुळे ग्रंथांच्या संख्येत भरपूर प्रमाणात वाढ झाली. आज ग्रंथाचा उपभोग करणे हे एक आधुनिक सुशिक्षितांचे लक्षण बनले आहे. जुनी ग्रंथ साठवणूकीच्या कल्पनेची जागा काही महत्त्वाच्या बाबीच्या प्रसाराने घेतली. जसे ग्रंथ वाचक व कर्मचारी ग्रंथाची संख्या वाचक व ज्ञान यांच्या वाढीसोबतच ग्रंथालयाच्या संख्येत व आकारात सुध्दा लवकरच वाढ झाली. त्यामुळे हया वाढीसोबतच काही तोटे सुध्दा वाढले व त्यामध्ये ग्रंथ हरविणे हा एक महत्वाचा तोटा समजला जातो. आधुनिक पध्दती व तंत्राचा योग्य अंमल करून सुध्दा ग्रंथ हरविणे सफलतापूर्वक थांबविल्या जावू शकत नाही. त्यामुळे ग्रंथ हरविल्यानंतर त्याची वसूली ही कशा पध्दतीने करावी हयाचा अभ्यास हा ग्रंथपालाला करावा लागतो.

ग्रंथचोरीमध्ये गरीब वाचकच नाही तर श्रीमंत वाचक सुध्दा सामील असल्याचे निदर्शनास आले आहे. आपण हे सुध्दा म्हणून शकत नाही की अपरिपक्व व गैरजिम्मेदार विद्यार्थी हे दूष्कृत्य करण्याच्या मोहात पडतात कारण सन्माननीय व्यक्ती ज्यामध्ये साधूंचा सुध्दा समावेश आहे. [illegible] सुध्दा हा गुन्हा केल्याचे आढळले आहे. ग्रंथ हरविण्याच्या उदाहरणाचा मानसिक दृष्ट्या अभ्यास केला गेला आणि ग्रंथ हरविण्याची दोन कारणे निदर्शनास आलीत.

कधी कधी ग्रंथ आणि इतर वाचन साहित्य गैरअधिकारयुक्त पध्दतीने वाचक ग्रंथालयामधून नेतात जर वाचक एखाद्या विशीष्ट ग्रंथत अतिउत्सुक असला तर तो ते ग्रंथ

apkateacher.com

मिळविण्याचा प्रयत्न करेल आणि जर ते ग्रंथ खरेदी करण्यासाठी त्याच्याकडे पैसे नसतील तर तो दुसरा मार्ग अवलंबतो. हया प्रकारचा तोटा हा नकारात्मक तोटा मानल्या जातो कारण ग्रंथ नेण्यामागील उद्देश हा कही अपायकारक विचार नाही, परंतू अवलंबिलेला मार्ग कोणत्याही प्रकारे योग्य नाही म्हणून या कृतीला कोणत्याही प्रकारे उत्तेजन देवू नये आणि ग्रंथाच्या संग्रहावर योग्य लक्ष ठेवायला हवे व ग्रंथालयात मुक्तव्दार पध्दती असली तरी जो पुस्तक मागायला येतो तेव्हा त्याच्याजवळ ओळखपत्र असल्याशिवाय व त्यावर त्याचा फोटो असल्याशिवाय त्याला परवानगी देवू नये. कारण गहाळ झालेल्या ग्रंथाची किंमत
करतांना अडचण जावू शकते म्हणून.

कधी कधी ग्रंथ चोरून नेणारे हे खुल्या बाजारात विकण्यासाठी चोरतात हयामध्ये बहुतेक जास्त किंमतीची ग्रंथ असतात. त्यामध्ये ग्रंथ गहाळ करण्याचे कारण हे त्या ग्रंथाची किंमत असते व ती त्यांच्या दृष्टीकोनातून महत्वाची बाब असते. नुकसान हे त्या व्यक्तीच्या विकत घेण्याच्या क्षमतेवर किंवा त्याच्याकडे असणाऱ्या पैशावर अवलंबून नसतें. हे नुकसान निश्चीतपणे एक प्रकारचे [illegible]कारात्मक मदत घ्यायला पाहिजे व अशा प्रकारचें नुकसान टाळण्यासाठी सुरक्षा व्यवस्था सुध्दा अधिक कडक करावयास हवी व त्यानंतर सुध्दा ग्रंथ गहाळ होत असतील तर

[illegible] ग्रंथालयामधून पुस्तकाचे नुकसान थांबविण्यासाठी कर्मचारीवृंद सुशिक्षित व कार्यक्रम असायला पाहिजे. सर्वोत्तम सुरक्षा अतिशय माणूसकीची वागणूक व योग्य देखरेख ग्रंथालयातील पुस्तकाचे नुकसान कमीत कमी करू शकते.

apkateacher.com

१९६० ते १९७० मध्ये प्रकाशित झालेले पुस्तक वापरण्यात आलेले असते व नंतर काही कालावधीनंतर ते हरविले किंवा गहाळ झाले असे सूचित करण्यात येते त्याची किंमत इतकी नगण्य असते व आज त्याची किंमत करणे तितकेच अडचणीचे झाले आहे.

ग्रंथपालाला नेहमी प्रश्न पडतो की हयाची किंमत कशी ठरवावी कारण प्रकाशनात नसलेले पुस्तक कुठलेही प्रकाशक त्याची किंमत सांगू शकत नाही. हयावर वाचकांकडून किती किंमत वसूल करावी हा प्रश्न नेहमी पडलेला असतो. त्याची किंमत तिप्पट घ्यायची का ? असा आढावा घ्यायला हवा व ही किंमत कितपत योग्य आहे हयासाठी या विषयाचा अभ्यास या समस्येला वाचा फोडण्यासाठी हयावर उपाय शोधून काही तोडगा निघतो का? असे मनात आले साधारणता ही समस्या कोणत्याही महाविद्यालयात जास्त भेडसावत असल्याने त्याचे संशोधन त्याच क्षेत्रात सुरू आहे. ग्रंथ हरविल्यानंतर त्याची वसूली कशी करावी असे कुठल्या ही संस्थेमार्फत सुचविले गेले नाही किंवा GOC नी सुध्दा हया समस्येबद्दल कुठलेच अधिनियम अमलात आणले नाही. कुणी पुस्तकाची दुप्पट किंमत वसूल करतात तर कुणी पुस्तकाची पाचपट किंमत वसूल करतात. त्याच्या पाचपट किंमत वसूल करावी किंवा त्या ग्रंथाची दुसरी प्रत त्यांच्याकडून मागवावी अशा प्रकारे किंमत वसूल करावी का, जेणेकरूनं त्याला त्याच्या गहाळ करण्याच्या चुकीचा पश्चाताप झाला पाहिजे.

जेव्हा ग्रंथ विनामूल्य वापरायची सुविधा दिल्या जाते तेव्हा समाजाचे नैतीक आदर्श लयास जातात. जेव्हा ग्रंथालयाच्या देखरेखीकरीता पुरेसा कर्मचारीवृंद नसतो तेव्हा ग्रंथ हरविणे अटळ असते आणि अंततः जेव्हा ग्रंथपालावर वाचकाच्या वाढत्या मागणीचे व ग्रंथालयाच्या सुविधाच्या विस्ताराचे ओझे जास्त होते. या आधुनिक
असणाऱ्या व्यक्तीने ग्रंथपालावर ग्रंथ हरविल्याची जबाबदारी लादू नये व त्यावर ग्रंथाची वसूली कशा प्रकारे करावी हयावर उपाय सुचवायला पाहिजे.

ग्रंथ हरविण्यासाठी बऱ्याच बाबी कारणीभूत आहेत. ग्रंथालयाचे चूकीचे व्यवस्थापन आणि वाचक, नैसर्गिक आपत्ती जसे आग, दुष्काळ, [illegible] पाणी तसेच उंदीर, किटके, चुकीची प्रसार व्यवस्था, इमारतीचे चुकीचे बांधकाम इत्यादी बाबी ग्रंथ गहाळ होण्यास कारणीभूत आहेत. हे नुकसान टाळण्यासाठी ग्रंथालयाने सुध्दा काही उपयायोजना आत्मसात केल्या आहेत. विद्यापीठ अनुदान आयोग व ग्रंथालयासाठी सल्लागार ग्रंथ हरविण्यास आळा घालण्यासाठी आत्मसात करायच्या उपयायोजना सुचविल्या आहेत. ग्रंथ हरविल्याचा

apkateacher.com

प्रश्न आणि यासाठी जबाबदार बाब यावर अभ्यास सुध्दा केला गेला आहे. अशा नुकसानीसाठी खालील काही बाबी कारणीभूत आहेत.

- ग्रंथालयाचा प्रकार
- वाचकाचा प्रकार
- खुला व बंद रस्ता
- स्टॉक रूमची व्यवस्था आणि कर्मचारीवृंद

वाचक सुध्दा वेगवेगळया प्रकारचे असतात. काही उच्चशिक्षीत व पुस्तकावर प्रेम करतात. तर काही नसतात. ज्या ग्रंथालयाचे वाचक सुशिक्षित असतात. त्या ग्रंथालयात पुस्तकांचे नुकसान कमी किंवा नगण्य असते. प्रवेश ही एक आणखी महत्वाची बाब पुस्तक हरविण्यासाठी कारणीभूत आहे. प्रत्येक समाजात काही असमाजिक तत्व असतात. व्यक्ती कधी कधी बहूमुल्य पुस्तके चोरतात किंवा त्यातील चित्र आणि पाने फाडतात. बहूमुल्य पुस्तके बऱ्याचदा वाचक चोरतात तेव्हा त्याची वसूली एकतर ग्रंथाच्या आजच्या किंमतीच्या पाचपट नाहीतर त्याच ग्रंथाची दुसरी प्रत त्याच्या कडून मागवावी.

पुस्तके साठविण्याच्या रूमचे संरक्षण सुध्दा तेवढेच महत्वाचे आहे. ही रूम एवढी सुरक्षित असावी की कोणीही या रूममधून पुस्तक चोरणार नाही. ही रूम नैसर्गिक आपत्ती जसे आग, धूरपाणी, किडे आणि उंदीर यापासून पुस्तकाचा बचाव करण्यास समर्थ असायला हवे.

apkateacher.com

हया शोध प्रबंधामध्ये प्रश्नावली द्वारे माहिती मिळविण्यात आली. त्यासाठी व्यक्तीगत पध्दतीने सार्वजनिक ग्रंथालयाला भेट देवून ग्रंथपालांना प्रश्नावली देण्यात आली. त्यामध्ये ग्रंथालयाची स्थापणा कोणत्या वर्षी झाली त्याचप्रमाणे ग्रंथालयात असणारे कर्मचाऱ्यांची संख्या दरवर्षी ग्रंथालयात दाखल होणाऱ्या ग्रंथाची सरासरी संख्या ग्रंथपडताळणी केली जाते का, किती कालावधी नंतर केली जाते, गहाळ होणाऱ्या ग्रंथाची नोंदणी कोणत्या प्रकारे करता ? ग्रंथ गहाळ होण्याची कारणे दरवर्षी वाचकांच्या माध्यमातून गहाळ होणाऱ्या ग्रंथाचे प्रमाण जर वाचकाकडून ग्रंथ गहाळ होत असेल तर त्यांची वसुली कोणत्या प्रकारे केली जाते. वाचकांनी ग्रंथ गहाळ झाल्याचे सुचित केल्यावर कोणते पर्याय अमलात आणले जातात गहाळ झालेल्या ग्रंथांची वसुली करण्यासाठी कोणत्या प्रकारचे ग्रंथ गहाळ होतात आतापर्यंत किती ग्रंथ गहाळ झाल्यावर त्यांची वसुली करण्यासाठी कोणती पध्दत अंमलात आणली जाते. व दुर्मीळ ग्रंथासाठी कोणती पध्दत अंमलात आणता हयावरुन तुम्हांला जे महत्वाचे व अनुभवावरुन नमुद करण्यासारखे वाटते ते लिहा. इत्यादी माहिती या शोध प्रबंधामध्ये समाविष्ट केली आहे.

**(क) व्यवसायाच्या दृष्टीकोनातून गरज काय :-**

ब्रम्हपुरी तालुक्यातील सार्वजनिक ग्रंथालयात गहाळ झालेल्या ग्रंथाच्या वसुली बाबतचा समस्यांचा अभ्यास. हा विषय मी का निवडला याची कारण मिमासा प्रस्तावणेत केली आहे. व त्याचे उद्देश सुध्दा सांगीतले आहेत. अशा हयांची व्यवसाय दृष्टीकोनातून काय गरज आहे. हयांचा विचार करावा लागतो. म्हणजेच ग्रंथपाल हा जो असतो त्याची भुमिका हे एक

apkateacher.com

व्यवस्थापकाची भूमिका असते. व ग्रंथपालन हा एक व्यवसाय समजल्या जातो. म्हणून हयांचे महत्व समजून घ्यावे लागते.

सार्वजनिक ग्रंथालयात ही समस्या म्हणजे ग्रंथ गहाळ झाल्यावर त्यांची वसुल कशा पध्दतीने करावी हया समस्येचा उलगडा ग्रंथपालालाच करावा लागतो. त्यामुळे त्यामध्ये कोणता उपाय सोईस्कर ठरले हयांचा विचार ग्रंथपालालाच करावा लागतो. ग्रंथालयाचे व प्रशिक्षण म्हणजे एक व्यवसायीक प्रशिक्षण होय त्यामुळे व्यवसायीक प्रशिक्षण घेत असतांना त्यांना कोणत्या समस्येंला समोर जावे लागते त्यांचा विचार करावा लागतो.

ग्रंथालयाचे व्यवसायीक प्रशिक्षण घेत असतांना ग्रंथ हा एक अत्यंत महत्वाचे मानले जाते व ज्या ग्रंथाची आवश्यकता असते नेमका तोच ग्रंथ गहाळ झालेला असतो. तेव्हा त्यांच्या प्रशिक्षणात हा अडथळा निर्माण होत असतो. व रंगनाथन यांनी सांगीतलेल्या तिससा सुत्रांचा इथे विचार झालेला नसतो. म्हणजेच प्रत्येक वाचकाला त्यांच्या आवडीचा ग्रंथ न मिळो म्हणजेच हया व्यवसायीक प्रशिक्षणात खंड पडत असतो. म्हणुन हया विषयाच्या अभ्यासासाठी व्यवसायीक [illegible] गरज आहे.

अशा प्रकारे कोणीही कलम घोषित केले नाही. अशा प्रकारे सार्वजनिक ग्रंथालयातील गहाळ झालेल्या ग्रंथांच्या वसुलीबाबतच्या समस्यांचा अभ्यास मी सुरु केला आहे.

**(अ) उद्देश:**

१. ग्रंथालयात वाचकाकडून गहाळ झालेल्या पुस्तकांच्या कोणकोणत्या समस्या आहेत त्यांचा अभ्यास

२. गहाळ झालेल्या पुस्तकांची वसुली कशी करावी त्यांच्यावर तोडगा काढणे.

३. सत्य परिस्थीती गहाळ झालेल्या पुस्तकावर कोणती प्रक्रीया आणतात.

apkateacher.com

४. साधारणता हरविलेल्या पुस्तकांचा बोझा वाचकावर किंवा ग्रंथालयावर अधिकत्म पडणार नाही हे पडताळून पाहणे.

५. समकक्ष ग्रंथालयात असलेल्या सर्वक्ष (सर्व समावेक्षक) समस्येबाबत उपाय-योजना सुचविणे.

६. गहाळ झालेल्या पुस्तकांचा समस्येंचा संदर्भात असलेल्या बाबींना वाचा फोडणे.

७. पुस्तकाचे नुकसान टाळण्यासाठी ग्रंथालयाचे व्यवस्थापण धोरण समजावून घेणे.

८. पुस्तकांचे नुकसान झाल्यावर त्याची वसुली करण्यासाठी कोणती पध्दत जास्त परीणाम कारक ठरेल. की जी ग्रंथालयात वापरावी लागेल. हयाचा अभ्यास

९. नैसर्गीक आपत्तीपासून होणारे पुस्तकाचे नुकसान टाळण्यासाठी प्रतीबंधनात्क उपाय शोधणे.

१०. पुस्तकाचे नुकसान टाळण्यासाठी कर्मचाऱ्याकडून आत्मसात केलेली सुरक्षा व्यवस्था व देखरेखीची पध्दत पडताळून पाहणे

११. वाचकांना जास्त चांगल्या सुविधा देण्यासाठी पुस्तकाची किंमत ठरविणे किंवा ग्रंथालयात अस्तीवात असलेली साधणे जसे कर्मचारी, साहित्य व ईमारत पुरेशी आहे किंवा नाही हे पडताळून पाहणे.

**(ब) विस्तार :-**

सदर शोध प्रबंधाचा विषय " ब्रम्हपुरी तालुक्यातील सार्वजनिक ग्रंथालयामध्ये गहाळ झालेल्या समस्यांबाबतचा अभ्यास" असा असून हया शोध प्रबंधासाठी ब्रम्हपुरी तालुक्याची निवड केली आहे.

या शोध प्रबंधासाठी ब्रम्हपुरी तालुक्यातील सार्वजनिक ग्रंथालयाचा समावेश केलेला आहे. त्यासाठी ब्रम्हपुरी तालुक्यातील सार्वजनिक ग्रंथालयातील ग्रंथपालाकडून प्रश्नावली भरुन मिळविलेली आहे.

प्रश्नावली ही मराठी भाषेत तयार केलेली असून ती ग्रंथपालांना लवकर समजेल अशाच भाषेत तयार केली आहे. त्यामुळे ती ग्रंथपालांना लवकर समजून ती भरून देण्यास सोईस्कर असायला पाहिजे. हे ध्येय ठेवून प्रश्नावली
तयार करण्यात आली.

apkateacher.com

# प्रकरण २

## सार्वजनिक ग्रंथालय

apkateacher.com

## प्रकरण २ रा

# सार्वजनिक ग्रंथालय

सार्वजनिक ग्रंथालय ही एक सामाजिक संस्था असून तीथे प्रामुख्याने ग्रंथ आणि माहिती देणारी अन्य आणि विविध साधणे उदा. नियतकालीके, वृत्तपत्रे, दृकश्राव्य साधणे, सांस्कृतिक उपक्रम हयांच्या साहाय्याने समाजातील विविध स्तरातील लोकांना त्यांच्या गरजेनुसार वाचन साहित्य देवून काही सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम राबवून नविन माहिती, नवे ज्ञान पुरविण्याचे आणि त्याद्वारे समाजाच्या सर्व स्तरात लोक शिक्षण करण्याचे काम सार्वजनिक ग्रंथालय करतात.

एक समाज घटक म्हणुन तुम्ही तुमच्या परिसरातील एखाद्या सार्वजनिक ग्रंथालयाला भेट दिली असेलच. किंवा अशा एखाद्या सार्वजनिक ग्रंथालयाचे तुम्ही वर्गणीदा सभासदही असू शकाल. ग्रंथालयाच्या अलिकडच्या काळात जे विविध प्रकार निर्माण झाले आहेत त्या सर्वांमधील लोकप्रिय व लोकाभिमुख प्रकार म्हणजेच सार्वजनिक ग्रंथालय हा होय. सार्वजनिक ग्रंथालयाचा समाजाच्या विकासामध्ये महत्वाचे सहभाग असतो. किंबहूना बहुजन समाजातील सर्व सामान्य अशा सर्व लोकांना वाचन साहित्याच्या माध्यमातून मनोरंजन माहिती आणि नवे ज्ञान देण्यासाठी केलेली सार्वजनिक व्यवस्था म्हणजेच सार्वजनिक ग्रंथालय होय.

apkateacher.com

समाजाने समाजासाठी निर्माण केलेले ग्रंथालय म्हणजे सार्वजनिक ग्रंथालय होय. अशा ग्रंथालयात समाजातील सर्व थरातील लोकांना त्यांच्या गरजेनुसार ज्ञान, माहीती, शिक्षण व मनोरंजनासाठी विविध प्रकारचे वाचनसाहीत्य उपलब्ध करून दिले जाते. ही ग्रंथालये गाव, तालुका, राज्य व देश पातळीवर कार्यरत असतात. विविध प्रकारच्या सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमाद्वारे लोकशिक्षणाचे अत्यंत महत्वाचे कार्य त्यांच्याद्वारे पार पाडले जातात.

- ग्रंथालय व त्याचे प्रकार
- सार्वजनिक ग्रंथालयाचे स्वरूप
- सार्वजनिक ग्रंथालयाचे उद्दिष्टय
- सार्वजनिक ग्रंथालयाचे कार्य
- सार्वजनिक ग्रंथालयात दिल्या जाणाऱ्या सेवा.

**ग्रंथालय व त्याचे प्रकार :**

**ग्रंथालय म्हणजे काय ?**

ग्रंथालय या शब्दाचा सर्वसाधारण अर्थ ग्रंथ + आलय असा केला जातो. आजच्या आधुनिक प्रवाहात इतकाच अर्थ मर्यादीत राहिलेला नाही. तर आधुनिक काळाच्या आवश्यकतेनुसार फक्त ग्रंथसंग्रह महत्त्वाचा नसून त्यापेक्षा संग्रहाचा उपयोग महत्वाचा आहे.

apkateacher.com

**व्याख्या :-**

ज्या ठिकणी संग्रहीत ग्रंथासोबत इतर वाचनीय सामुग्रीचे संकलन केले जाते व ज्या सामुग्रीला वाचण्याकरीता व उद्बोधन करण्याचा कार्यासाठी उपयोगात आणले जाते ते ठिकाण म्हणजे ग्रंथालय होय.

**ग्रंथालयाचे प्रकार :-**

ग्रंथालयाचा वाचक वर्गाचा व्यवसाय वयोमर्यादा, शैक्षणिक पातळी, वाचनाचा हेतु यावरून प्रकार पडलेले असतात.

१- शैक्षणिक ग्रंथालय

२- सार्वजनिक ग्रंथालय

३- विशेष ग्रंथालय

४ - विभागीय शासकीय ग्रंथालय

५- व्यक्तीगत / खाजगी ग्रंथालय

**सार्वजनिक ग्रंथालय :-**

सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे जनतेने जनतेसाठी जनतेच्या पैशातून चालविलेले ग्रंथालय म्हणजे सार्वजनिक ग्रंथालय होय. सार्वजनिक ग्रंथालय हे आजच्या वर्तमान काळातील स्वयंशिक्षणाचे एक उत्तम साधन आहे. सार्वजनिक स्वरूपाच्या ग्रंथालयात सर्वच

apkateacher.com

प्रकारचे वाचक येतात. त्यात बाल, तरूण, प्रौढ, स्त्रिया, संशोधक अभ्यासक इ.चा समावेश होतो. त्यामुळे सर्वच प्रकारच्या व सर्वच स्तरावरील वाचन साहित्याचा व साधनांचा समावेश सार्वजनिक ग्रंथालयात करणे क्रमप्राप्त ठरते.

**सार्वजनिक ग्रंथालयाचे प्रकार :-**

राष्ट्रीय ग्रंथालय →राज्य केंद्रीय →विभागीय →जिल्हा ग्रंथालय →तालुका ग्रंथालय →पंचायत ग्रंथालय

## ➢ सार्वजनिक ग्रंथालयाचे स्वरूप :-

सार्वजनिक ग्रंथालये वर व्याख्येत सांगितल्याप्रमाणे जनतेने, जनतेसाठी, जनतेच्या पैशातून चालविलेले असते ते स्वयंशिक्षणाचे एक उत्तम साधन असते.

## ➢ सार्वजनिक ग्रंथालयाचे उद्दिष्ट्ये

• समाजातील सर्व वर्गांच्या अध्ययन व माहिती संबंधीच्या गरजा विनाशुल्क अथवा शुल्क घेऊन पूर्ण करणे.

• समाजातील सर्व स्तरावरील लोकांची सेवा करणे.

• नवसमाजाची निर्मिती करण्यास मदत करणे.

• ज्ञानाचे सामाजिकरण करणे.

• मनोरंजनात्मक व सांस्कृतिक स्वरूपाचे कार्य करणे.

apkateacher.com

• अल्पसंख्यांक, अपंग, रूग्ण किंवा कैदी यांचा स्वतंत्र प्रकारची सेवाही प्रदान करणे.

**सार्वजनिक ग्रंथालयाचे कार्य :-**

१. **शिक्षण** :- सार्वजनिक ग्रंथालयामार्फत शैक्षणिक कार्य पार पाडले जाते. त्यामध्ये औपचारीक अनौपचारीक व प्रौढ शिक्षण यांसारख्या कार्याची पूर्तता
केली जाते.

२. **संशोधन कार्य** :- समाजातील विविध स्तरावरील अभ्यासक, शास्त्रज्ञ, संशोधक यांना ही त्यांच्या संशोधन कार्यात सार्वजनिक ग्रंथालय मदत करीत असते.

३. **सांस्कृतीक कार्य** :- पिढ्यान् पिढ्या चालत आलेला आपला सांस्कृतिक वारसा हा सार्वजनिक ग्रंथायातून जोपासला आणि टिकवला जातो. त्यातूनच पुढच्या पिढीला आपल्या इतिहासासंबंधी माहिती मिळत असते.

४. **माहिती पुरविण्याचे कार्य** :- समाजातील प्रत्येक घटकास माहिती पुरविण्याचे कार्य सार्वजनिक ग्रंथालय करते.

५. **मनोरंजन** :- वाचकांच्या मनोरंजनासाठी ही सार्वजनिक ग्रंथालय प्रयत्न करीत असते. हा हेतू सार्वजनिक ग्रंथालयातून गृहित धरला जातो.

६. **उदयोग आणि व्यापार** :- उदयोग आणि व्यापाऱ्यांच्या अन्य गोष्टीशीही आणि त्यांच्या वाद आणि विस्तारासाठी सार्वजनिक ग्रंथालय कार्य करते.

apkateacher.com

**व्याख्या :-**

सार्वजनिक ग्रंथालयाची व्याख्या सन १९४९ मध्ये UNESCO या आंतरराष्ट्रीय संस्थेने तयर केली. ही व्याख्या नंतर १९७२ मध्ये आणि सन १९९४ मध्ये सुधारण्यात आली. ती UNESCO PUBLIC LIBRARY च्या जाहिर नाम्यात देण्यात आली.

- सार्वजनिक पैशातून तीचा आर्थिक निर्वाह चालतो.
- वाचकांकडून कोणतीही वर्गणी घेत नाही तरीही तिचा पूर्णपणे उपयोग करण्याचा अधिकार वाचकाला राहिल.
- जात, धर्म, व्यवसाय, स्त्री, पुरुष इ. कुठलाही भेदभाव वाचकांबाबत राहणार नाही. खऱ्या अर्थाने सर्वांना मोफत व मुक्त ग्रंथालय राहील.
- ती स्वयंशिक्षणासाठी उपयुक्त संस्था राहिल.
- त्यामध्ये शैक्षणिक ज्ञानवर्ग, माहिती देणारे साहित्य राहील हे साहित्य विविध विषयांवरील विविध वाचकांच्या गरजा व समाजात आवडीनिवडी पुरवली.

**Mr. William Evert यांच्या मते,**

जे ग्रंथालय जनतेद्वारा स्थापीत, जनतेला समर्पित जनतेच्या मनोरंनाकरीता निश्चित नियमाव्दारे स्थापीत व जनतेच्या खर्चाने संचालीत असेल अशा ग्रंथालयाला सार्वजनिक ग्रंथालय म्हणतात.

apkateacher.com

**सार्वजनिक ग्रंथालयात वाचन साहित्याची निवड :-**

**(As per UNESCO)**

- सर्व पातळ्यांवरील व सर्व वयाच्या वाचकांच्या गरजा भागविणारी वाचन साहित्य असावे.
- या ग्रंथालयाच्या संग्रहात हस्तलिखितांपासून दृकश्राव्य साधनांपर्यंत सर्व प्रकारच्या माध्यमांचा समावेश असावा.
- स्थानीक लोकांच्या गरजा त्यांना अवगत असलेली भाषा यांचा विचार करून वाचन साहित्याचा संग्रह करावा.
- प्रादेशिक संदर्भ ग्रंथांचा साठा असावा.
- आधुनिक समाजाच्या आधुनिक गरजांच्या पूर्ततेसाठी साहित्य आणि त्यासाठी लागणारी सर्व यंत्रसामुग्री असणे आवश्यक आहे.

**समाजात सार्वजनिक ग्रंथालयाचे योगदान :-**

समाजातील सार्वजनिक ग्रंथालयातील वाचक खालीलप्रमाणे विभागले जाऊ शकतात.

**१) कुटूंब :-**

समाजातील प्रमुख घटक म्हणजे कुटूंब हे कुटूंबच ग्रंथालयाचे वाचक आहेत. त्यामुळे ग्रंथालयात अशी वाचनसामुग्री असावयास हवी की, ज्या साहित्याचा संबंध गृहव्यवस्था, बालमनोविज्ञान, वैवाहिक जीवन, योगा,

पारिवारीक संबंध, गृहअर्थविज्ञान, रोग निदान, समाजकल्याण इ. बाबत वाचन साहित्य असावयास हवे.

apkateacher.com

**२) विदयार्थी :-**

विदयार्थ्यांचा संबंध शैक्षणिक वाचनसाहित्याशी येतो. त्यामुळे विदयार्थ्यांना लागणारी शैक्षणिक पुस्तके, ग्रंथ या ग्रंथालयात असावयास हवी.

**३) व्यावसायीक :-**

या क्षेत्रात व्यवसाय निवडीशी संबंधीत वाचक किंवा नोकऱ्याच्या संबंधीत असतात. त्यामुळे त्यांना स्पर्धात्मक पुस्तके रोजगारासंबंधी माहिती शिष्यवृत्ती, उच्चशिक्षणासंबंधी, सामान्य ज्ञानासंबंधीच्या पुस्तकांची आवश्यकता असते.

**४) वयस्क (प्रौढ वाचक)**

यात नवसाक्षर वयस्क यांचा समावेश होतो त्यामुळे ग्रंथालयात धार्मिक, आध्यात्मीक ग्रंथ असले पाहिजे. या ग्रंथाचा लाभ हे वाचक घेऊ शकतात. त्याचा परिणाम समाजाच्या विकासासाठी होऊ शकतो.

**५) फावल्या वेळेचा उपयोग करणारे वाचक :-**

या प्रकारच्या वाचक वर्ग फार मोठा असतो. या करीता ग्रंथालयात प्रादेशीक भाषेतील कथा, कांदबऱ्या हलके-फुलके साहित्य की जेणेकरुन त्यांना वाचनात आनंद मिळेल.

**६) विशेष वस्तीचे वाचक :-**

यात नेत्रहीन, वृद्ध रोगी, कैदी, मनोरूग्न इ. प्रकारच्या वाचकांचा समावेश होतो. या प्रकारच्या वाचकांकरिता विशेष प्रकारचे साहित्य ठेवणे आवश्यक आहे.

apkateacher.com

**सार्वजनिक ग्रंथालयाचे विभाग**

१) ग्रंथदेवघेव विभाग

२) संदर्भ विभाग

३) नियतकालीक विभाग

४) विशेष विभाग :- अ) बालवाचक विभाग

:- ब) स्त्रीवाचक विभाग

**प्रमाणके :-**

• सर्व प्रकारची वाचनसामग्री असावी.

• सर्व वाचकांना मुक्तव्दार पद्धती असावी.

• वाचनकक्षाची सोय असावी.

• संदर्भ व माहितीसेवा देण्याकरीता प्रशिक्षीत कर्मचारी असावा.

• फिरत्या ग्रंथालयाची सोय असावी.

• जिल्हा ग्रंथालय हे राज्य ग्रंथालयाशी जोडलेले असावे.

• राष्ट्रीय विभागीय संशोधन व विशेष ग्रंथालय या सर्वांशी संबंधीत असेच सार्वजनिक ग्रंथालयाचे नेटवर्क असावे.

• विस्तारीत सेवा देण्यात याव्यात.

• ग्रंथालयाच्या कामकाजाची वेळ वाचकांच्या सोईनुसार असावी. या प्रमाणकांमुळे सर्व सार्वजनिक ग्रंथालये एक साहित्यस्थान, सांस्कृतीक केंद्र, शैक्षणिक संस्था, या मासिक संस्था, सुचना मार्गदर्शन केंद्र आणि मनोरंजनाचे उत्तम स्थळ आहे असे समजण्यात येईल.

apkateacher.com

# प्रकरण ३

# संशोधन पध्दती

apkateacher.com

# प्रकरण तिसरे

## संशोधन पध्दती

संशोधन म्हणजे ज्ञानासाठी शोध असाच संशोधनाचा अर्थ व्यवहारात प्रचलित आहे. बौध्दिक आणि व्यवहारिक समस्याची उत्तरे शोधून काढणे हा संशोधनाचा प्रयत्न असतो. संशोधन ही अत्यंत काळजीपूर्वक आणि टिकात्मक स्वरूपाची चौकशी असून त्याव्दारे तथ्य आणि तत्वे शोधून काढली जातात. काहीतरी निश्चित ज्ञान प्राप्त करण्यासाठी यात जाणीवपुर्वक तपास केला जातो असा वेबस्टरच्या शब्दकोशात संशोधनाचा अर्थ स्पष्ट केला आहे.

संशोधन हा ज्ञानाचा अविभाज्य घटक आहे. वर्तमान ज्ञानात नविन ज्ञानाची भर टाकणे हे संशोधनाचे मुलभूत कार्य आहे. संशोधन ही ज्ञान प्राप्त करण्याची वैज्ञानिक पध्दती आहे. सर्व शास्त्राचा विस्तार आणि विकास करण्यासाठी संशोधन केली जातात. प्रत्येक शास्त्राच्या अभ्यास विषयानुसार त्यातील संशोधनाचे स्वरूप वेगळे असते.

apkateacher.com

**संशोधनाचा अर्थ :-**

संशोधन हा इंग्रजी भाषेतील Research या मराठी भाषेतील पर्यायी शब्द आहे. वेबस्टरच्या शब्दकोषानुसार "संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नविन तत्वे अथवा तथ्ये शिधण्यासाठी जुनी तत्वे अथवा तथ्ये यांचे पुन्हा पुन्हा परिक्षण करण्यासाठी केलल्या चिकित्सक व पध्दतशीर अभ्यास होय." एखाद्या विषयासंबंधी किंवा घटनेसंबंधी अधिकाधिक ज्ञान मिळविणे आणि त्याची अधिकाधिक कारणमीमांसा करणे म्हणजे संशोधन होय. बुध्दीनिष्ठ आणि व्यावहारिक प्रश्नांची आणि समस्यांची शास्त्रीय पध्दतीव्दारे समाधानकार उत्तरे शोधून काढण्याचा संशोधन हा एक पध्दतशीर प्रयत्न असतो.

सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि नैतिक स्वरूपाच्या घटना सातत्याने घडत असतात. त्यात निश्चित कार्यकारण संबंध असतो परतू तो आपल्याला माहित नसतो. त्यातील कार्य आणि कारणभाव याच्यातील अन्योन्य संबंधाचे विश्लेषण करून त्याचा शोध घेणे हा सामाजिक संशोधनाचा उद्देश आहे. आपल्या अनुभवाच्या कक्षेत येणाऱ्या घटनेसंबंधी असे का? हा प्रश्न आपल्या मनात येणे आणि त्यामुळे आपले मन अस्वस्थ होणे हीच संशोधनाची पहिली पायरी आहे. वर्तमान स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी जाणीवपूर्वक केलेल्या प्रयत्नांना संशोधन असे म्हणतात. संशोधनामुळे समाजाच्या विकासाला मदत होते. संशोधन हा एक प्रवाह आहे कारण संशोधनाचे कार्य कधीच कधीच संपत नसते. एखाद्या समस्येचे समाधानकारक उत्तरं शोधण्यासाठी केलेल्या संशोधनातून अनेक दुसऱ्या अनपेक्षीत समस्या निर्माण होतात आणि त्यासाठी पुन्हा संशोधन करावे लागते. अशाप्रकारे संशोधन हा सतत नव्याचा शोध घेण्याचा एक व्यवस्थित व संघटित प्रयत्न आहे.

apkateacher.com

**संशोधनाच्या व्याख्या :-**

१) जे. डब्ल्यू. बेस्ट :-

“खऱ्या अर्थाने संशोधन म्हणजे वैज्ञानिक पध्दती प्रत्यक्षात कार्यान्वीत करण्याची अधिक नियमबध्द सुव्यवस्थित आणि सखोल अशी प्रक्रिया आहे."

२) हेरींग :-

“शास्त्रीय संशोधन ही एक संचयी प्रक्रिया आहे. विशेषतः सामाजिक शास्त्रामध्ये ती एक नकारात्मक प्रक्रिया सुध्दा आहे. केवळ ज्ञान संपादन करूनच नव्हे तर कालबाहय गृहीत रद्द करून सुध्दा क्षमता विकसित होवू शकते."

३) डॉ. बोधनकर प्रा. अलोणी :-

“एखादया समस्येचे उत्तर शोधण्यासाठी वैज्ञानिक पध्दती आणि तंत्राव्दारे संकलीत केलेल्या माहितीचे आणि त्यांचे वस्तूनिष्ठ मुल्यमापन केल्यानंतर नविन तथ्यांचा शोध घेवून विविध घटकांतील कार्यकारण सिध्दांताचे आणि नियमांचे प्रतिपादन करणारी प्रक्रिया म्हणजे संशोधन."

४) एम. एच. गोपाल :-

"संशोधन म्हणजे अत्यंत पध्दतशीर पध्दतीने घेतलेल्या अज्ञात सत्याचा शोध."

apkateacher.com

५) क्लीफर्ड मुडी :-

"सत्य शोधनाची पध्दती म्हणजेच संशोधन होय."

६) जे. डब्ल्यु. बेल्ड :—

“संशोधन म्हणजे वैज्ञानिक पध्दती प्रत्यक्षात कार्यान्वीत करण्याची अधिक नियमबध्द, आकारबध्द सुव्यवस्थित आणि सखोल अशी प्रक्रिया आहे."

## संशोधनाची वैशिष्टे :-

- संशोधन हा ज्ञानाचा शोध आहे.
- संशोधनामुळे समस्येला उत्तर सापडते.
- संशोधनासाठी वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब केला जातो. विश्लेषण केले जाते आणि नविन तंत्राचा उपयोग केला जातो.
- संशोधन काळजीपूर्वक चिकित्सक आणि पध्दतशीरपणे केलेली चौकशी आहे. ती वस्तुनिष्ठ चौकशी आहे. त्यासाठी गहन चिंतन केले जाते. तसेच त्याच तत्वे व सत्ये शोधून काढली जातात आणि त्यातील सहसंबंधाचा अभ्यास केला जातो.
- संशोधन ही कोणतीही घाई गडबड न करता शांत चित्ताने करावयाची अध्ययन प्रक्रिया आहे. त्यासाठी सुक्ष्म विचार मंथनाची आवश्यकता असते.
- संशोधनासाठी सुरवातीला गृहीत कृत्ये निश्चित केली जातात आणि त्यासाठी उपाययोजना सुचविली जाते.

apkateacher.com

- संशोधनामुळे जुन्या संकल्पनेत आणि गृहीत कृत्यामध्ये सुधारणा केली जाते. त्यामुळे जुन्या तथ्यांचे परिक्षण करून नविन तथ्यांचा शोध घेतल्या जातो.
- संशोधनासाठी समेक आणि नविन आकडेवारी गोळा केली जाते. या संकलीत माहितीचे आणि आकडेवारीचे परिक्षण करून मुल्यमापन केले जाते.
- विविध घटकांतील कार्यकारण संबंध स्पष्ट केला जातो आणि नैसर्गिक व सामान्य नियमाचे प्रतिपादन केले जाते.

**संशोधन पध्दती म्हणजे काय ?**

"कोणत्याही समस्याचा विषयानुसार अभ्यास करण्यासाठी विशिष्ट क्रम ठरविणे किंवा एखाद्या विशिष्ट क्रमाचा अवलंब करणे म्हणजे संशोधन पध्दती होय. "

एखाद्या समस्येचे उत्तर शोधण्यासाठी वैज्ञानिक पध्दती आणि तंत्राव्दारे संकलीत केलेल्या माहितीचे आणि समंकाचे वस्तुनिष्ठ मुल्यमापन केल्यानंतर नविन तथ्यांचा शोध घेवून विविध घटनातील कार्यकारण संबंधाच्या आधारे सर्व सामान्य सिध्दांतांचे व नियमांचे वर्णन करणारी प्रक्रिया म्हणजे संशोधन पध्दती होय.

सर्व ग्रंथालयात सारखी पध्दती अवलंबीलेली नाही. पुरातन काळातील ग्रंथ जर गहाळ झाला तर त्या ग्रंथाची आजची किंमत कशी ठरवावी त्याबाबत सुध्दा प्रत्येक महाविद्यालयात मतभिन्नता आढळून येते. आजपर्यंत कोणतेही ग्रंथालय हया समस्येपासून मुक्त होवू शकले नाही. ग्रंथ गहाळ होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. हया समस्येवर काही तोडगा काढण्यासाठी संशोधन पध्दतीचा वापर करावा लागतो.

apkateacher.com

**संशोधन पध्दतीचे महत्व :-**

समस्येचे उत्तर शोधण्यासाठी संशोधन पध्दतीचा वापर केला जातो. त्यामुळे संशोधन पध्दतीला महत्व प्राप्त झाले आहे.

**संशोधन पध्दतीचे प्रकार :-**

१) वर्णनात्मक

२) ऐतिहासिक

३) प्रायोगिक

संशोधन पध्दतीचे तीन प्रकार आहे.

**१) वर्णनात्मक :-**

वर्णनात्मक संशोधनात कोणत्याही घटनेच्या, समाजाच्या, सामाजिक संस्थेच्या किंवा एखादया उपक्रमाच्या सद्यस्थितीचा सर्वकष अभ्यास करून प्रगतीचा आढावा घेण्यात येतो व विश्लेषणात्मक वर्णन करण्यात येते. अशा सर्व संशोधनास वर्णनात्मक संशोधन म्हणतात. सामाजिक शास्त्रात हया पध्दतीचा वापर केल्या जातो व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हे सुध्दा सामाजिक शास्त्र असल्याने हया शास्त्रातील बहुतांश संशोधन हे वर्णनात्मक आहे. वर्णनात्मक संशोधन हे सत्य शोधनाशी संबंधीत असते. हयामध्ये सत्य परिस्थितीचा शोध घेणे हे हया पध्दतीचे उद्दिष्ट असते.

apkateacher.com

वर्णनात्मक संशोधन पध्दतीमध्ये माहिती गोळा करण्यासाठी ज्या तंत्राचा उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जातो ते म्हणजे पाहाणी तंत्र सत्यशोधन हा उद्देश असल्याने पाहाणीमध्ये परिस्थितीचे अचूक वर्णन करावे लागते. बऱ्याच वेळा पाहणी करायला सुरूवात करण्याआधी नमूना पाहाणी करावी लागते. या नमूना पाहाणीत आपण तयार केलेली प्रश्नावली किंवा आखलेली मुलाखत माहिती मिळविण्याच्या दृष्टीने योग्य झाली आहे की नाही हे तपासून पाहावे. ग्रंथालयीन सेवा आणि ग्रंथालयाचा होत असलेला वापर यांची सांप्रत स्थिती जाणून घेण्यासाठी केला जातो. त्यामध्ये मुख्यत्वेकरून मुलाखत आणि प्रश्नावली हीच दोन साधने वापरली जातात. वर्णनात्मक संशोधन पध्दतीची चार वैशिष्टये आहेत.

- वस्तुनिष्ठपणे गोळा केलेली माहिती.
- गोळा केलेल्या माहितीचे तंत्रशुध्द विश्लेषण,
- चिकित्सा
- चिकित्सेला लाभलेली चिंतनाची पार्श्वभूमी.

वर्णनात्मक संशोधन पध्दतीत पाहाणी या माहिती गोळा करण्याच्या तंत्राचा फार मोठा प्रमाणावर उपयोग केला जातो. ग्रंथालय व माहितीशास्त्रात पाहाणी हे तंत्र फार मोठया प्रमाणात वापरण्यात आले आहे.

**२ ) ऐतिहासिक संशोधन पध्दती :-**

वर्णनात्मक संशोधनात संशोधक सद्यःस्थितीचा अभ्यास करतो. या उलट ऐतिहासिक संशोधन पध्दतीत भूतकालीन परिस्थितीचा अभ्यास केला जातो. आज घडणाऱ्या घटना आणि भूतकाळात घडलेल्या घटना यांच्यात काही कार्यकारण संबंध आहे का हे तपासण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येतो.

apkateacher.com

वर्तमान परिस्थिती ही भूतकालीन परिस्थितीची परिणामी आहे. हया दोहोंमध्ये कार्यकारण संबंध आहे. ऐतिहासिक संशोधन पध्दतीमध्ये हा संबंध काय आहे याचा शोध घेण्यात येतो. ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातसुध्दा असे घडत असते.

भूतकालीन घटनांचा अभ्यास वर्तमान परिस्थितीची कल्पना निर्माण करता यावी म्हणून करावा लागतो. अशा अभ्यासान्वये साध्या घडणाऱ्या ऐतिहासिक पार्श्वभूमी समजते. ज्या पध्दतीने असा अभ्यास केला जातो. हिला ऐतिहासिक पध्दती म्हणतात.

**३) प्रायोगिक संगोधन पध्दती :-**

प्रायोगिकतेला जसा ग्रंथालय व्यवस्थापनात वाव आहे तसाच तो ग्रंथालयशास्त्र शिक्षणातही आहे. अभ्यासक्रम निर्मिती ही एक संशोधन पध्दती आहे असे 'व्हीटनी' यांनी सांगितले आहे. प्रत्येक संशोधन कार्यात जेव्हा प्राथमिक अनुमानाच्या सत्यसत्यतेची चाचणी घेण्याची वेळ येते तेव्हा प्रायोगिक संशोधन पध्दतीच्या उपयोजनेला सुरूवात होते.

"संशोधनाच्या प्रक्रियेत त्याला त्याने सुरूवातीला केलेल्या अंदाजात योग्य ते फेरबदलही करावे लागतात. हया एकूण प्रक्रियेला प्रायोगिक संशोधन पध्दती म्हणतात." प्रायोगिक संशोधनात प्रयोगपूर्व आणि प्रयोगोत्तर चाचण्या हे दोन महत्वाचे टप्पे आहेत. हयामध्ये कार्यकारणी संबंध निश्चित करणे हाच मुख्य हेतू असतो. प्रायोगिकता आणि

apkateacher.com

मोजमापन या दोन गोष्टीमुळे प्रायोगिक संशोधन पध्दतीला महत्व प्राप्त झाले आहे. ग्रंथालयाच्या सर्व कार्यामध्ये प्रायोगिक संशोधन पध्दतीच्या उपयोजनेला वाव आहे. ग्रंथालयाच्या व्यवस्थापनात प्रायोगिकतेला असलेला वाव आणि त्यांच्या सेवेत सुधारणा करण्याची सततची गरज हयामुळे अर्कहर्ट यांनी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हे प्रायोगिकशास्त्र आहे असे म्हटले आहे.

प्रायोगिक संशोधन पध्दतीची प्रक्रिया चार गोष्टीच्या उपयोजनामुळे पूर्ण होते.

- प्रयोगाच्या लक्ष्याचे दोन समसमान गट
- निवडलेल्या प्रायोगीक घटकांची यापैकी एका गटात उपस्थितो
- ज्या गटात हा घटक उपस्थित नाही त्या घटावर संपूर्ण नियंत्रण
- घडून येणाऱ्या घटकाचे शास्त्रसुध्द मोजमापन

हा अभ्यास विषयात म्हणजे " ब्रम्हपुरी तालुक्यातील सार्वजनिक ग्रंथालयात गहाळ झालेल्या ग्रंथाच्या वसूलीबाबतच्या समस्यांचा अभ्यास" हया मध्ये संशोधन पध्दती आहे. कारण वर्णनात्मक पध्दतीत पाहणी तंत्राचा वापर करावा लागतो व हया पाहणी तंत्राची दोन प्रमुख साधने आहेत.

१) मुलाखत

२) प्रश्नावली

हया शोध प्रबंधामध्ये ही प्रश्नावलीचा वापर केल्यामुळे हयात वर्णनात्मक संशोधन पध्दती समजल्या जाते.

apkteacher.com

**प्रश्नावली :-**

एखाद्या समस्येच्या संदर्भात व्यक्तीकडून अथवा व्यक्ती समुहाकडून माहिती मिळविण्याठी तयार केलेली क्रमबध्द व सुव्यवस्थीत तालीका प्रश्नसुची म्हणजेच प्रश्नावली होय.

प्रश्नावली ही स्वतः जाऊन उत्तरदात्याकडून भरून आणली जाते. तर कधी ती पोस्टाने संबंधीत व्यक्तीकडून पाठविली जाते. संबधीत व्यक्ती ती प्रश्नावली तयार करून व्यवस्थित भरून संशोधनकर्त्याकडे पाठवितात.

**प्रश्नावलीची व्याख्या :-**

**१) जी. ए. लुण्डबर्ग :-**

भौतिक स्वरूपात प्रश्नावली ही प्रेरणेचा असा समुह आहे की जो शिक्षीत लोकांकडून या प्रेरणेच्या अंतर्गत त्यांच्या दैनिक व्यवहाराचे अवलोकन करण्यासाठी प्रस्तुत केल्या जातो.

**२) विल्सन गी. :-**

"विस्तृत क्षेत्रात मोठ्या संख्येने पसरलेल्या अथवा एखादया निवडलेल्या छोटया क्षेत्रात पसरलेल्या लोकांकडून मर्यादीत प्रभागात तत्थ्ये संकलन करण्याची सरळ पध्दती म्हणजेच प्रश्नावली होय."

apkateacher.com

**प्रश्नावलीची वैशिष्टये :-**

- प्रश्नावलीत अध्ययन विषयाबाबतच्या प्रत्येक पैलूविषयी अनेक प्रश्न एका सूचीच्या स्वरूपात असतात.
- क्षेत्रातील व्यक्तीकडून, समुहाकडून किंवा गटाकडून एकाचवेळी तथ्य संकलन करता येते.
- प्रश्नावली द्वारे असलेल्या प्रश्नांची उत्तरे तो स्वतः हा भरतो
- प्रश्नावली तंत्राद्वारे कमी वेळात व कमी खर्चात जास्त तथ्याचे संकलण करता येते
- निरिक्षण व मुलाखत तंत्राच्या तुलनेत प्रश्नावली द्वारे होणारे संकलण वस्तुनिष्ठ असते.
- प्रश्नावलीचा उपयोग शिक्षीत उत्तर दात्यासाठीच केला जातो.
- प्रश्नावली एकाच वेळी अनेक उत्तर दात्याकडे पाठविली जाते.

**शोध प्रकल्पात प्रश्नावलीचे महत्व**

प्रस्तुत "ब्रम्हपुरी तालुक्यातील सार्वजनिक ग्रंथालयामध्ये गहाळ झालेल्या ग्रंथाच्या वसुलीबाबतच्या समस्यांचा अभ्यास" मध्ये प्रश्नावलीचा वापर केलेला आहे खरच ग्रंथालयात ग्रंथ पडताळणीची गरज आहे का हे जाणून घेण्यासाठी संशोधन कर्त्यांने विषयाला अनुसरुन समजण्यास योग्य अशा प्रश्नाची प्रश्नावली तयार करुन संबंधित सार्वजनिक ग्रंथालयाच्या ग्रंथपालाकडून भरुन आणली आहे.

apkateacher.com

# प्रकरण ४थे

# सार्वजनिक ग्रंथालयाची ओळख

apkateacher.com

## प्रकरण ४ थे

## सार्वजनिक ग्रंथालयाची ओळख

प्रकल्पासाठी निवडण्यात आलेल्या ग्रंथालयाची नांव व त्यांची स्थापना वर्षे

| अ.क्र. | ग्रंथालयाचे नांव | स्थापना वर्षे |
|---|---|---|
| १ | लोकमान्य टिळक सार्व. वाचनालय ब्रम्हपुरी | १९०३ |
| २ | सम्यक सार्वजनिक ग्रंथालय, ब्रम्हपुरी | १९९४ |
| ३ | समता वाचनालय, उदापूर ता. ब्रम्हपुरी | १९९४ |
| ४ | सार्वजनिक वाचनालय, मालडोंगरी ता. ब्रम्हपुरी | २००३ |
| ५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सार्व. वाचनालय, वांद्रा | २००३ |
| ६ | सार्वजनिक वाचनालय, चिंचोली ता. ब्रम्हपुरी | २००२ |
| ७ | सार्वजनिक वाचनालय, खेळ ता. ब्रम्हपुरी | २००१ |
| ८ | सार्वजनिक वाचनालय, खंडाळा ता. ब्रम्हपुरी | २००३ |

apkateacher.com

## सार्वजनिक वाचनालयाची थोडक्यात माहिती

### १) लोकमान्य टिळक सार्व. वाचनालय ब्रम्हपुरी

या ग्रंथालयाची स्थापना १९०३ या साली झाली हे ग्रंथालय बाजार चौक ब्रम्हपुरी येथे आहे. या ग्रंथालयाचा दर्जा अ असून या ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. राज देऊलकर हे आहेत. त्यानी सि.लिब. पर्यंतचे शिक्षण प्राप्त केले आहे. या ग्रंथालयात ६ कर्मचारी कामास असून ग्रंथालयात ग्रंथाची संख्या २२,३१० आहे ग्रंथालयात वेगवेगळी [illegible] वृत्तपत्रे येतात. नियतकालीके, साप्ताहीके, पाक्षिके, या सारख्या वाचन साहित्याची भर पड़ते ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांची प्रवृत्ती उत्साही स्वरुपाची आहे. ग्रंथलयात मुक्तद्वार, प्रणाली उपलब्ध करुन दिली आहे. त्यात एकाच वेळी ५० वाचक बसु शकतात.

### २) सम्यक सार्वजनिक वाचनालय ब्रम्हपुरी

या ग्रंथालयाची स्थापना १९९[illegible] या साली झाली हे ग्रंथालय भिम वार्ड, ब्रम्हपुरी येथे आहे. या ग्रंथालयाचा दर्जा क असून या ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. राष्ट्रपाल आर. गायकवाड हे आहेत. त्यानी एम.लिब. पर्यंतचे शिक्षण प्राप्त केले आहे. या ग्रंथालयात २ कर्मचारी कामास असून ग्रंथालयात ग्रंथाची संख्या २,६२२ आहे ग्रंथालयात वेगवेगळी ६ वृत्तपत्रे येतात. नियतकालीके, साप्ताहीके, पाक्षिके, या सारख्या वाचन साहित्याची भर पडते ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांची प्रवृत्ती उत्साही स्वरुपाची आहे. ग्रंथलयात मुक्तद्वार, प्रणाली उपलब्ध करुन दिली आहे. त्यात एकाच वेळी २५ वाचक बसु शकतात.

apkateacher.com

**३) समता सार्वजनिक वाचनालय उदापूर ता. ब्रम्हपुरी**

या ग्रंथालयाची स्थापना १९९४ या साली झाली हे ग्रंथालय बौध्द विहाराजवळ उदापूर येथे आहे. या ग्रंथालयाचा दर्जा क असून या ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. राहुल मेश्राम हे आहेत. त्यानी ग्रंथालया संबंधीचे कोणतेच शिक्षण किंवा पदविका त्यांनी प्राप्त केलेली नाही. या ग्रंथालयात १ कर्मचारी कामास आहे. व संबंधित ग्रंथपाल यांचे शिक्षण मात्र एम.ए. बी.पी.एड. असे आहे. ग्रंथालयामध्ये ग्रंथांची संख्या तर ३३७१ आहेत. ग्रंथालयामध्ये सहा वेगवेगळी वृत्तपत्रे येतात. नियतकालीकांमध्ये मासीके, साप्ताहिके, पाक्षिके यासारख्या वाचन साहित्याची भर पडते.

ग्रंथालयामध्ये येणाऱ्या वाचकांची प्रवृत्ती उत्साही स्वरूपाची आहे. कारण वाचक सतत वाचन साहित्याची मागणी करीत असतात.

प्रौढ वाचकांच्या संदर्भात, त्यांची संख्या २५० आहे. ग्रंथालयात मुक्तव्दार प्रणाली वाचकांसाठी उपलब्ध करून दिली आहे. ग्रंथालयाला स्वतंत्र वाचन कक्ष आहे. त्यामध्ये कमीत कमी २५ जण एकाच वेळी बसू शकतात.

**४. सार्वजनिक वाचनालय मालडोंगरी ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर :-**

या ग्रंथालयाची स्थापना इ.स. २००३ ला झाली. या ग्रंथालयाचा दर्जा 'क' आहे.

ग्रंथपाल आशिष प्रधान यांचे शिक्षण B.Com झालेले आहे. त्यांनी ग्रंथालयासंबंधी कोणतीच पदवीका किंवा शिक्षण आत्मसात केलेले नाही.

apkateacher.com

ग्रंथालयात ते स्वतःच एक कर्मचारी आहेत. ग्रंथालयात मुक्त व्दार प्रणाली अस्तीत्वात आहे.

या ग्रंथालयात ग्रंथांची संख्या ११०५ आहे. दरवर्षी मिळणाऱ्या अनुदानातून ग्रंथ खरेदी केली जाते. ग्रंथालयाची वाचक संख्या ७१ आहे. या ग्रंथालयाला स्वतंत्र वाचन कक्ष आहे. त्यामध्ये जास्तीत जास्त २० वाचक एकावेळी बसू शकतात. ग्रंथालयामध्ये वृत्तपत्रे, नियतकालिके यांच्यासाठी नियीमत वाचक वर्ग अस्तित्वात आहे.

ग्रंथालयात प्रौढ वाचकांसाठी साखळी योजना घरपोच पुस्तक सेवा यासारख्या योजना राबविल्या जातात. प्रौढ वाचक संख्या २२ आहे.

**५. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सार्वजनिक ग्रंथालय वांद्रा ता. ब्रम्हपूरी :-**

या ग्रंथालयाची स्थापना इ.स. २००३ या वर्षी झाली. या ग्रंथालयाचा दर्जा 'ड' आहे. ग्रंथपाल खुशाल कामडी यांनी सुध्दा ग्रंथालयांचा आवश्यकतेचे शिक्षण घेतलेले नाही. त्यांचे शिक्षण १२ पास आहेत

ग्रंथालयात ते स्वतः आणि आणखी एक असे दोन कर्मचारी कार्यरत आहेत. ग्रंथालयात मुक्तव्दार पद्धती अस्तीत्वात आहे. ग्रंथालयात ग्रंथांची संख्या ४७१ आहे. आणि वृत्तपत्रे, नियतकालीके यांचाही वापर वाचक करतात वाचकांची संख्या ७० आहे.

apkateacher.com

प्रौढ वाचकांची संख्या १५ आहे. तरीही ग्रंथालयात सर्वच प्रकारचे वांचक येतात. या ग्रंथालयाला स्वतंत्र वाचन कक्ष नाही. पण त्या ग्रंथालयाच्या वऱ्हाडयाचा वाचक तसा उपयोग करू शकतात.

**६. सार्वजनिक ग्रंथालय, चिंचोली, पो. हरदोली ता. ब्रम्हपूरी :-**

या ग्रंथालयाची स्थापना इ.स. २००२ मध्ये झाली आणि या ग्रंथालयाचा दर्जा 'क' आहे. ग्रंथपाल श्रीराम राऊत यांनी ग्रंथालयाबद्दलचे व्यावसायीक शिक्षण घेतलेले नसून त्यांनी आपले B.A. पूर्ण केले आहे.

वाचक संख्या ९३ आहे. ग्रंथालयात ते स्वतःच कर्मचारी आहे. ग्रंथालयात सर्वच स्तरातले वाचक येतात. ग्रंथालयात ग्रंथांची संख्या ३८२ आहे. वाचकांसाठी मुक्तव्दार प्रणाली अस्तीत्वात आहे. त्यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार सोई पुरविल्या जातात.

या ग्रंथालयात प्रौढ वाचकांची संख्या १९ आहे. ग्रंथालयाला स्वतंत्र वाचनकक्ष आहे. त्यामध्ये एकावेळी १५ जण बसू शकतील.

**७. सार्वजनिक ग्रंथालय नेहरू चौक, खंडाळा, पो. कहाली ता. ब्रम्हपूरी :-**

या ग्रंथालयाची स्थापना इ.स. २००३ मध्ये झाली. या ग्रंथालयाचा दर्जा 'ड' आहे. ग्रंथपाल अमरदिप राखडे हे पदवीधर आहेत.

ग्रंथालयातील ग्रंथांची संख्या ८४९ आहे. संपूर्ण वाचकसंख्या ४७ आहे तर प्रौढ वाचक १५ ते २० च्या दरम्यान आहेत. ग्रंथालयात मुक्तव्दार प्रणाली अस्तीत्वात आहे. ग्रंथालयाला स्वतंत्र वाचन कक्ष आहे. त्यामध्ये १० जण एकत्र बसू शकतील अशी सोय आहे.

ग्रंथालयात वर्तमानपत्रे, नियतकालिके यांच्यासाठी वाचक जास्त प्रमाणात येतात.

**८. सार्वजनिक ग्रंथालय खेड मक्ता पो. खेड ता. ब्रम्हपूरी:-**

या ग्रंथालयाची स्थापना इ.स. २००१ साली करण्यात आली आणि याचा दर्जा 'ड' आहे.

ग्रंथालयाच्या ग्रंथपाल सौ. अनुराधा महाडोळे यांनी ग्रंथालयासंबंधीचे शिक्षण घेतलेले नाही. पण त्यांनी त्यांचे १२ वी (Com) उत्तीर्ण केले आहे.

ग्रंथालयात ग्रंथाची संख्या ७३९ आहे. आणि वाचकांसाठी मुक्तव्दार प्रणाली अस्तीत्वात आहे. एकूण वाचन १०५ आहेत तर त्यापैकी [illegible]५ वाचक हे प्रौढ आहेत.

ग्रंथालयाला स्वतंत्र वाचन कक्ष आहे. आणि त्यामध्ये फ़र्निचर उपलब्ध आहे.

<u>**विषय परिशिष्ट प्रश्नसंच**</u>

मी **[illegible]वीर आर. कपूर** ने.हि. महाविद्यालय ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर सन २०२३-२४ साली ग्रंथालय व माहिती शास्त्र पद्व्यूत्तर व पदविसाठी "ब्रम्हपुरी तालुक्यातील सार्वजनिक ग्रंथालयाची गहाळ झालेले ग्रंथाच्या वसुलीबाबतचा समस्यांचा अभ्यास" या विषयावर आवश्यक शोध प्रबंधक अभ्यासत आहे. आपणास विनंती करतो की, आपण आपल्या वेळातील अमुल्य वेळ काढून प्रतिक्रिया देवून सहकार्य करावे.

apkateacher.com

**<u>शोध प्रबंधाचे उद्देश :-</u>**

सार्वजनिक ग्रंथालयात वाचकाकडून गहाळ झालेल्या ग्रंथाच्या कोणकोणत्या समस्या आहेत, त्यांचा अभ्यास.

गहाळ झालेल्या ग्रंथाची वसुली कशी करावी त्यावर तोडगा काढणे. सत्यपरिस्थितीत गहाळ झालेल्या ग्रंथावर कोणती प्रक्रीया अमलात आणता.

साधारण हरविलेल्या ग्रंथाचा बोजा वाचकावर किंवा सार्वजनिक ग्रंथालयावर अधिकतम पडणार नाही. हे पडताळून पाहाणे.

समक्ष ग्रंथालयात आले असलेल्या सर्वक्ष समस्येबाबत उपाययोजना सुचविणे.

गहाळ झालेल्या ग्रंथाच्या समस्येच्या संदर्भात असलेल्या बाबींना वाचा फोडणे.

आपला

**रणवीर आर. कपूर**

ने.हि. महाविद्यालय ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर

apkateacher.com

# प्रकरण ५ वे

# निष्कर्ष

apkateacher.com

# प्रकरण ५ वे

# निष्कर्ष

ब्रम्हपुरी तालुक्यात आठ सार्वजनिक ग्रंथालयाचा अभ्यास केलेला आहे. त्यामध्ये माहिती संकलीत करण्यासाठी प्रश्नावलीचा वापर केला असून आठ सार्वजनिक ग्रंथालयातील ग्रंथपालाकडून ती भरुन मिळाली आहे.

हया शोध प्रंबधात ब्रम्हपुरी तालुक्यातील सार्वजनिक ग्रंथालयामध्ये गहाळ झालेल्या ग्रंथालयाबाबतचा अभ्यास करुन खालील निष्कर्ष काढलेला आहे.

❖ वाचकाकडून ग्रंथ गहाळ होणाऱ्या समस्या म्हणजे वाचक स्वत: हा जाणून- बुजून ग्रंथ दुसऱ्या कपाटात ठेवतात किंवा काही वाचक व्यवसायीक दृष्टीकोनातून ग्रंथाचा वापर करतात. हया समस्यांवर तोडगा काढणे म्हणजे वाचकांना ग्रंथ व्यवस्थीत हाताळण्यास नेहमी मार्गदर्शन करणे.

❖ वाचकाकडून ग्रंथ गहाळ झाल्यास ग्रंथाची बाजारात मिळणारी नविन प्रत

❖ त्यांच्या कडून मागवावी किंवा ग्रंथाच्या आजच्या किंमतीच्या दुप्पट किंमत

❖ वसुल करावी

❖ सत्य परिस्थीती ग्रंथ गहाळ होत असेल तर सार्वजनिक ग्रंथालयातील ग्रंथालय अनुदान आयोगाकडे अशी शिफारस करावी की, तसेच ती ग्रंथालयीन समस्या समजून दर हजार पुस्तकांमागे [illegible] ते [illegible] ग्रंथ गहाळ होत असतील तर ते

apkateacher.com

❖ सांधारण नुकसान समजण्यात यावे व तेवढी पुस्तके खारीज करावी अशी शिफारशीला मंजूरी मिळवावी की जेणेकरून विद्यार्थ्यावर व ग्रंथालयावर याचा बोजा पडणार नाही.

❖ आग लागून, पुराच्या पाण्यामुळे, किटके, उंदीर इत्यादीपासून ग्रंथ खराब होत असेल तर त्यासाठी हया सर्व बाबींपासून संरक्षण होईल अशी रूमची व्यवस्था करावी.

❖ ग्रंथालयाचे व्यवस्थापन धोरण समजून घ्यावे म्हणजे ग्रंथ गहाळ होण्याच्या समस्येसाठी कोणते नियम आहेत हयाचा अभ्यास करावा व सर्व कर्मचाऱ्यांना हयाची माहिती दयावी.

❖ ग्रंथाचे नुकसान वाचकांकडून झाले तर त्यांच्याकडून ग्रंथाची बाजारात मिळणारी नविन प्रतच मागवावी कारण दुप्पट किंमत जरी वसूल केली तरी कर्मचाऱ्यांना ग्रंथ मागणी ही करावीच लागेल हयामुळे वेळ खर्च होईल.

❖ नैसर्गिक आपत्ती म्हणजे पाऊस, पुराचे पाणी, आग, धूर, उंदीर हयापासून संरक्षण करण्यासाठी ग्रंथालय हे जमीनीपासून वरच्या अंतरावर असायला पाहिजे तसेच खिडक्या अशा असाव्या की फक्त सूर्यप्रकाश दिसेल परंतु पाऊस लागणार नाही आणि खिडक्यांना जाळी लावयला पाहिजे आणि त्या रूममध्ये स्वच्छता असायला हवी.

❖ कर्मचाऱ्यांकडून दरवर्षी ग्रंथ परिगणन करवून घ्यायला पाहिजे.

❖ ग्रंथालयातील प्रत्येक कर्मचारी हा आपल्या पात्रतेनुसार शिक्षीत

❖ असावयास हवा.

❖ ग्रंथालयात मुक्तव्दार पद्धतीचा वापर कमी करायला पाहिजे व असे असेल तर कर्मचाऱ्यांनी सतत बारकाईने लक्ष ठेवायला पाहिजे.

apkateacher.com

❖ GOD (God Office Committee) अधिनियमानुसार फार कमी ग्रंथाची किंमत २०० रू. च्या आत आहे हयावर काहीतरी तोडगा काढायला पाहिजे.

❖ ग्रंथालयातील प्रत्येक कार्यासाठी एक स्वतंत्र कर्मचारी नेमायला पाहिजे म्हणजे तो आपले कार्य सुरळीत पार पाडू शकेल.

❖ ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांनी वाचकांना पुस्तके हाताळण्याबद्दल व व्यवस्थित ठेवण्याबद्दल सतत मार्गदर्शन करायला पाहिजे.

❖ ग्रंथाच्या प्रतिमध्ये इलेक्ट्रानिक पट्टयांचा वापर करायला पाहिजे त्यामुळे ग्रंथ गहाळ होण्याचे प्रमाण कमी होवू शकते. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना कमी दरात झेरॉक्स सेवा उपलब्ध

❖ करून दयायला पाहिजे.

❖ विद्यार्थ्यांमध्ये सेवेबाबत व ग्रंथालयाबद्दल जागरूकता निर्माण कारणासाठी उपभोक्ता स्थितीज्ञान / सारखे कार्यक्रम राबवायला पाहिजे.

❖ काही ग्रंथ डॉलर मध्ये खरेदी केली जातात पण Acc रजिस्टरमध्ये त्याची किंमत रुपयात लिहली जाते तेव्हा असे न करता डॉलर व रुपयात दोन्ही मध्ये ग्रंथाची किंमत लिहावी.

# संदर्भ ग्रंथसुची

apkateacher.com

## संदर्भ ग्रंथसूची


- १. देशपांडे, दत्तात्रयं

सुलभ ग्रंथालय शास्त्र;

नागपूर: विश्व पब्लीशर अँड डिस्ट्रीब्यूटर.

- २. बोधनकर, सुधिर

सामाजिक संशोधन पध्दती;

नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन, १९९९.

- ३. भिलाड, वि.श.

शैक्षणिक संशोधन पध्दती;

नूतन प्रकाशन; १९९४.

- ४. सक्सेना, एल. एस.,

पुस्तकालय संगठन तथा व्यवस्थापन;

भोपाल: मध्यप्रदेश हिंदी ग्रंथ अकादमी.

- ५. व्यास, एस. डी.,

पुस्तकालय संघटन एवं प्रबंध;

जयपूर : पंचशील प्रकाशन, १९९७.

- ६. [illegible]ता[illegible]कर, सु.प्र.

ग्रंथालय व्यवस्थापन तंत्र व मंत्र; १९९५.

- ७. त्रिपाठी, एस. एम.

ग्रंथालय प्रबंध;

वाय के पब्लशर्स

- ८. आगलावे, प्रदीप.

संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे;

महाराष्ट्र विदयापिठ ग्रंथ निर्मीती

मंडळ, व्दितीय आवृत्ती १९८१.

- ९. मालशे, स. ग.

शोध निबंधाची लेखनपध्दती;

नागपूर : सुविचार प्रकाशन मंडळ, १९९०.

- १०. संत, दु. का.

संशोधन पध्दती प्रक्रीया आणि अंतरंग;

पुणे : विद्यार्थी गृह प्रकाशन १९६४

- ११. पाटील, वा. मा.

संशोधन पध्दती;

नागपूर : मंगेश प्रकाशन, १९९८.


apkateacher.com

# प्रश्नावली

apkateacher.com

# <u>प्रश्नावली</u>

**“ब्रम्हपुरी तालुक्यातील सार्वजनिक ग्रंथालयामध्ये गहाळ झालेल्या ग्रंथांच्या वसुलीबाबत समस्यांचा अभ्यास”**

---

अध्ययनकर्ता :-________________________________________

मार्गदर्शक :-________________________________________

1. सार्वजनिक ग्रंथालयाचे नांव:-______________________________

2. सार्वजनिक ग्रंथालयाचा पत्ता :-______________________________

______________________________

3. सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना:-______________________________

4.सार्व. ग्रंथ. कर्मचाऱ्यांची एकूण संख्या:-____________________________

5. सार्व. ग्रंथ. उघडे राहण्याचे तास:-

☐ 4 तास ☐6 तास ☐8 तास ☐10 तास

6. ग्रंथालयाचे स्वरूप:-

मुक्तद्वार:- ☐

बंदद्वार:- ☐

apkateacher.com

7. ग्रंथालयात असणाऱ्या ग्रंथाची एकूण संख्या:-________________________________

8. दरवर्षी दाखल होणाऱ्या ग्रंथाची संख्या

☐150 ☐300

☐600 ☐1000

9. ग्रंथपडताळणी केली जाते कां? :-

होय ☐ नाही ☐

10. ग्रंथपडताळणी केली जाते का किती कालावधी नंतर केली जाते ?

दरवर्षी ☐ पाच वर्षानंतर ☐

11. ग्रंथपडताळणी GOC अधिनियमाव्दारे करता काय ?

1) होय ☐

2) नाही ☐

3) इतर ☐

12. गहाळ झालेल्या ग्रंथाची नोंदणी केली जाते का ?

1) होय ☐

2) नाही ☐

13. गहाळ झालेल्या ग्रंथाची नोंदणी कोणत्या प्रकारे केली जाते ?

1) रजिस्टर पद्धतीने ☐

2) संगणक पद्धतीने ☐

3) इतर ☐

apkateacher.com

14. ग्रंथ गहाळ कोणत्या प्रकारे होतात ?

1) विद्यार्थ्यांव्दारे ☐

2) किड लागण्याव्दारे ☐

3) व्यवस्थित न ठेवल्याने ☐

4) इतर ☐

15. दरवर्षी सरासरी किती पूस्तके वाचकाच्या माध्यमातून गहाळ होतात ?

☐ 10 ☐ 25 ☐ 50 ☐ 100

16. जर विद्यार्थ्याकडून ग्रंथ हरविल्यास त्याच्याकडून ग्रंथाची वसूली कोणत्या पद्धतीने केली जाते.

1) ग्रंथाची प्रचलित किंमत वसून करून ☐

2) ग्रंथाच्या बदली तोच नविन ग्रंथ मागवून ☐

3) दुप्पट किंमत वसून करून ☐

4) फोटोस्टॅट कॉपी करून ☐

5) इतर ☐

17. वाचकांनी ग्रंथ गहाळ झाल्याचे सूचित केल्यावर आपण खालीलपैकी कोणते पर्याय मांडता ?

1) ग्रंथ शोधून आणून देणे ☐

2) ग्रंथाची बाजारात मिळणारी नविन प्रत आणून देणे ☐

3) कॉपी राईट कायदा उल्लंघन न होता प्रत आणून देणे ☐

apkateacher.com

4) तिप्पट रक्कम भरून देणे.

5) प्रचलीत रक्कम वसूली करणे.

6) इतर

18. गहाळ झालेल्या ग्रंथाची वसूली करण्यासाठी नियम आणि अधिनियम आहेत का ?

1) होय

2) नाही

19. असल्यास त्यांना सक्षम यंत्रणेकडून मान्यता मिळाली आहे का ?

1) होय

2) नाही

20. गहाळ झालेले ग्रंथ पुन्हा प्राप्त करता येतो काय ?

1) होय

2) नाही

21. जर पुन्हा प्राप्त करीत असल्यास कोणत्या प्रकारे ?

1) प्रकाशकाव्दारे

2) खरेदीव्दारे

3) इतर

apkateacher.com

22. कुठल्या प्रकारची ग्रंथ साधारणतः गहाळ होतात. ?

1) क्रमीक ग्रंथ ( Text Book) ☐

2) संदर्भ ग्रंथ ☐

3) किमती ग्रंथ ☐

4) इतर ☐

23. 2007 पर्यंत एकूण किती ग्रंथ गहाळ झालीत ?

☐50 ☐200 ☐300 ☐500

24. समजा एखादा ग्रंथ 18 व्या व 19 व्या शतकातील असेल तर त्या ग्रंथाची आजची किंमत कुठल्या पद्धतीव्दारे ठरविली जाते ?

1) विनिमय दरा नुसार ☐

2) वार्षिक ठराविक वाढ गृहीत धरून ☐

3) ग्रंथाच्या काही पटीत ☐

4) इतर ☐

25. दूर्मीळ ग्रंथ असेल तर त्याबाबत कुठली पद्धती अंमलात आणली जाते ?

1) जास्तीत जास्त किंमत वसूल करून ☐

2) ग्रंथाची इ[illegible]त आणून देणे ☐

3) इतर काही पद्धती असल्यास ☐

apkateacher.com

26. या सर्व प्रक्रियेत जे महत्वाचे व अनुभवावरून नमूद करण्यासारखे वाटते. अशा कमीत कमी तीन बाबी लिहा.

1)______________________________________________

______________________________________________

2)______________________________________________

______________________________________________

3)______________________________________________

______________________________________________

दिनांक :-

ग्रंथपालाची सही व शिक्का

apkateacher.com